॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

✻ सुविचार ✻

आत्मविश्वास ही यशाची
अर्धी गुरुकिल्ली आहे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### निषेध

सामाजिक कार्यकर्ते म्हणजे
अवघड जागेचे दुखणे आहे
ते बंद करा म्हणाले म्हणजे
त्यांच्यासमोर झुकणे आहे

बंद आता छंद झालाय
जातीवर या किंवा धर्मावर
पण रोजीरोटी बंद करून
बोट ठेवता येते का वर्मावर

# धीरज परदेशीची हत्या; अहिल्यानगरकर आक्रमक

**मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर डीएसपी चौकातील रास्तारोको मागे । विशेष सरकारी वकील, जलदगती न्यायालयासाठी प्रयत्नांची ग्वाही**



### सहा आरोपी अटकेत; कटाचा तपास सुरू

■ धीरज परदेशी हत्या प्रकरणात आतापर्यंत सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपींना १७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. हत्येच्या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. आरोपींना मदत केल्याचा आरोप असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांचीही चौकशी करण्यात येणार आहे. चौकशीत दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल, असे अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांनी आंदोलकांना सांगितले.

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** महापालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज कचरूसिंग राजपूत-परदेशी यांच्या निर्घृण हत्येने संतप्त झालेल्या नागरिकांचा आक्रोश सोमवारी रात्री रस्त्यावर पाहायला मिळाला. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, हत्येच्या कटातील सर्व आरोपींना अटक करावी, तसेच आरोपींची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटवावीत, या मागण्यांसाठी डीएसपी चौकात रास्तारोको करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

मुकुंदनगर परिसरातील दर्गा दायरा येथे पथदिव्यांच्या दुरुस्तीचे काम करत असताना धीरज परदेशी यांच्यावर हल्ला झाला होता. गंभीर जखमी अवस्थेत उपचार सुरू असताना रविवारी त्यांचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात त्यांच्या पार्थिवाचे इन कॅमेरा शवविच्छेदन करण्यात आले. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोमवारी रात्री पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात पार्थिव अहिल्यानगरमध्ये आणण्यात आले.

धीरज हत्येच्या निषेधार्थ आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अक्षय कर्डिले आणि संग्राम बापू भंडारे यांच्या नेतृत्वाखाली हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी डीएसपी चौकात आंदोलन सुरू केले. रात्री उशिरापर्यंत आंदोलन सुरू राहिल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे आणि प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी आंदोलकांशी चर्चा केली. मात्र, आंदोलक ठोस आश्वासनावर ठाम राहिले. त्यानंतर आमदार गोपीचंद पडळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला.

मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याचे तसेच खटला जलदगती न्यायालयापुढे चालविण्यासाठी उच्च न्यायालयाकडे विनंती करण्याचे आश्वासन दिले. आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केल्याचे आंदोलकांनी सांगितले.

आरोपींची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हटविण्यात येतील, तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी शासन कठोर पावले उचलेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली. त्यानंतर रास्तारोको मागे घेण्यात आला आणि धीरज परदेशी यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले.

## SPOT NEWS

### मुंबईत बनावट दूध कारखान्यावर छापा

● **मुंबई –** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या एफडीए विभागाकडून कारवाया सुरूच आहेत. आता मुंबईतील दहिसर आणि मालाडमध्ये २ मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून दहीसर येथे बनावट दूध कारखान्यावर छापा टाकण्यात आला असून अमूल, गोकुळसारख्या नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट दूध विक्रीचा पर्दाफाश करण्यात आला. तसेच मालाडमध्ये ब्लिंकिट कमर्शिअलच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत परवाना निलंबित केला. मुंबईच्या दहिसर पूर्व परिसरातील बनावट दूध तयार करणा-या टोळीवर गुन्हे शाखा कक्ष-१२ ने कारवाई केली. नामांकित कंपन्यांच्या दूध पिशव्या कापून त्यातील दूध काढून अस्वच्छ पाणी मिसळले जात होते. त्यानंतर पिशव्या पुन्हा सील करून अस्सल दूध असल्याचे भासवून विक्रीची तयारी केली जात होती. या प्रकरणी कारवाईत ४ पुरुष आरोपींना अटक करण्यात आली.

### १५ ऑगस्टपूर्वी महिलांच्या खात्यात जमा होणार १५०० रुपये

● **मुंबई –** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जुलै महिन्याचा १५०० रुपयांचा पहिला हप्ता येण्याची वाट पाहणा-यांसाठी आनंदाची बातमी आहे. नुकताच खात्रीलायक सूत्रांकडून मोठी माहिती मिळाली. त्यानुसार, १५ ऑगस्टपूर्वी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांच्या खात्यात जुलै महिन्याचे पैसे येण्याची दाट शक्यता आहे. मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत लाडक्या बहिणींच्या निधीचे थेट हस्तांतरण करण्याचा अंतिम निर्णय होऊ शकतो. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपये दिले जातात.

## उक्कडगावात ऊसाच्या शेतात आढळला अनोळखी पुरुषाचा मानवी सांगाडा

● **श्रीगोंदा । वीरभूमी –** तालुक्यातील उक्कडगाव शिवारातील गट क्रमांक ४३ मधील ऊसाच्या शेतात अनोळखी पुरुष व्यक्तीचा मानवी सांगाडा आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. याप्रकरणी बेलवंडी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शेतकरी दशरथ सोपान गोलांडे (वय ६९) हे ऊसाच्या शेतात गवत काढणीचे काम करीत असताना त्यांना शेतात मानवी सांगाडा आढळून आला. त्यांनी तत्काळ बेलवंडी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. प्राथमिक पाहणीत हा सांगाडा सुमारे तीन ते चार महिन्यांपूर्वीचा असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सांगाड्याजवळ फिकट आकाशी रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट, विटकरी रंगाची अंडरवेअर, पांढरे बनियन तसेच विटकरी रंगाची चप्पल आढळून आली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत.

प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार जावेद शेख पुढील तपास करीत आहेत.

पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की या वर्णनावरून संबंधित व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास बेलवंडी पोलिस ठाण्याशी ९८९०३२७०७२ किंवा ८८५७८८२२५५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## धीरजच्या मृत्यूनंतर शहरात पोलिसांची 'नजर'

**संवेदनशील भागांची एसपींकडून पाहणी; बंदोबस्त, गस्त वाढविण्याच्या सूचना**



● **अहिल्यानगर । वीरभूमी –** महानगरपालिकेतील कर्मचारी धीरज परदेशी यांच्या मृत्यू प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांनी शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील भाग आणि बाजारपेठ परिसराची पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली. संवेदनशील भागात पोलीस बंदोबस्त व गस्त वाढविणे, अफवा पसरू न देणे आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही पोलीस अधीक्षकांनी दिले. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

**कामगार युनियनचे बेमुदत काम बंद**

अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. पाणीपुरवठा व आरोग्यसेवा वगळता इतर सर्व नागरी सुविधा बंद ठेवण्यात आल्या आहेत. तसेच मुकुंदनगर परिसरातील सर्व नागरी सुविधा बंद ठेवण्याचा निर्णय युनियनने घेतला आहे. धीरज परदेशी यांच्यावर हल्ला करणाऱ्या सर्व आरोपींना अटक होईपर्यंत काम बंद आंदोलन सुरूच राहील, अशी ठाम भूमिका कामगार युनियनने घेतली आहे. मुकुंदनगर पोलीस चौकीत नियमित पोलीस कर्मचारी उपलब्ध नसणे आणि मनपा कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी आवश्यक संरक्षणाची हमी न मिळणे, या कारणांमुळे या परिसरातील नागरी सुविधा बंद ठेवण्यात येत असल्याचे युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# जिल्हाधिकारी कार्यालया समोर आयटक-सीटूची निदर्शने

**कामगारविरोधी धोरणांविरोधात आंदोलकांची घोषणाबाजी**



● **अहिल्यानगर । वीरभूमी –** केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा निषेध आणि विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीआयटीयू/सीटू) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ व कामगारविरोधी धोरणांविरोधात घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

या आंदोलनात आयटकशी संलग्न अहिल्यानगर महानगरपालिकेतील आशा वर्कर, मोहटादेवी देवस्थान, मढी देवस्थान तसेच अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सीआयटीयूचे पदाधिकारी व कार्यकर्ते ही आंदोलनात सहभागी झाले होते. आयटकचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा सेक्रेटरी अ‍ॅड. कॉ. सुधीर टोकेकर आणि सीआयटीयूचे प्रवीण सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन झाले. यावेळी कॉ. सतीश पवार, कॉ. मारुती दहिफळे, सचदेव ईश्वर, कॉ. सुभाष शिंदे, कॉ. कन्हैया बुंदेले, कॉ. महादेव पालवे, तसेच आशा संघटनेच्या अहिल्यानगर महानगरपालिका अध्यक्षा स्वाती भनगे, तब्सुम तांबोळी, शितल कापरे, शेख रुकसाना, विजया वाघ, सुंदराबाई वाघ, मोनाली धूपदरे, योगिता थोरात, जयश्री कव्हाणे, शेख अफसाना यांच्यासह अनेक कामगार प्रतिनिधी व महिला कर्मचारी सहभागी झाल्या.

केंद्र सरकारने लागू केलेले चारही नवीन कामगार कायदे (लेबर कोड्स) रद्द करून जुने कामगार कायदे पूर्ववत लागू करावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच औद्योगिक व कंत्राटी कामगारांना झक्र व एडखचे कायदेशीर लाभ सक्तीने द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली. मढी देवस्थान, मोहटादेवी देवस्थान व अवतार मेहेरबाबा ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांना दरमहा २८ ते ३० हजार रुपये वेतनवाढ द्यावी. आशा कर्मचाऱ्यांना किमान २५ हजार, तर गटप्रवर्तकांना ३० हजार रुपये वेतन लागू करावे. आशा कर्मचाऱ्यांवर आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या कामांव्यतिरिक्त अतिरिक्त कामाचा बोजा लादू नये, अशी मागणी करण्यात आली.

अहिल्यानगर महानगरपालिकेतील आशा कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्यावे, अशीही मागणी करण्यात आली. विविध कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा व सामाजिक सुरक्षा द्या, शालेय पोषण आहार कर्मचारी, मोलकरीण आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन २० हजार रुपये करून त्यांना पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.

पतसंस्था कर्मचाऱ्यांना सेवा नियम लागू करून पीएफ योजनेत समाविष्ट करावे तसेच दर दुसऱ्या व चौथ्या शनिवारी पतसंस्था बंद ठेवाव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. यासोबतच सर्व प्रकारच्या शेतमालाला योग्य व हमीभाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे चारही श्रम कायदे तातडीने मागे घेऊन वरील मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आयटक व सीटूच्या वतीने देण्यात आला.

## SPOT NEWS

### अकोले आयटीआयचा ८५ टक्के निकाल; हरिओम आंबरे तालुक्यात प्रथम

● **अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अकोले येथे जुलै २०२६ मध्ये ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेल्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेत संस्थेचा ८५ टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत वीजतंत्री प्रथम वर्षाचा प्रशिक्षणार्थी हरिओम धनंजय आंबरे याने ९६ टक्के गुण मिळवत अकोले तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याने थिअरी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष कामगिरी केली. वीजतंत्री प्रथम वर्षातील प्रशिक्षणार्थी विजय नथू सावंत याने ९५ टक्के गुण मिळवत तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला. यशस्वी सर्व प्रशिक्षणार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्य, शिक्षणाधिकारी एस. पी. मालुंजकर, प्राचार्य अरुण भालेराव, ट्रेड निदेशक एस. एन. हासे तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील सर्व निदेशक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र गायकवाड यांची नियुक्ती

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन या सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र महादूजी गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एम. एल. शर्मा यांच्या आदेशाने नियुक्तीचे अधिकृत अधिघोषण-पत्र जारी करण्यात आले. राजेंद्र गायकवाड हे अहिल्यानगर येथील रहिवासी असून, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. मानवाधिकारांचे संरक्षण, सामाजिक न्याय, वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संघटनेने महाराष्ट्र प्रदेश सचिवपदाची जबाबदारी दीली आहे. राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन ही कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेली सामाजिक संघटना आहे.

## माझी कविता

### चला गड्यांनो शाळेला जाऊ

चला गड्यांनो चला । शाळेला तुम्ही चला ।। धृ ।।

गाऊ सुंदर सुंदर गाणे ।
नाचू बागडू आनंदाने ।
आनंद शाळेचा घेऊ चला।।१ ।।

नदी मायेचा वाहतो झरा ।
मोर नाचे फुलवी पिसारा ।
मातीच्या वस्तू शिकूया कला ।।२।।

भूगोलाला शोधूया खनिज खाणी ।
भाषा गाती मंजूळ गाणी ।
फुलांच्या बनवूया सुंदर माळा ।।३।।

दाट झाडी पाऊस पाडी ।
घर छप्पर झोपडी माडी ।
निवारा कोणता हो चांगला ? ।। ४।।
चला गड्यांनो चला । शाळेला तुम्ही चला ।।

**– किशोर मिसाळ,**
मुख्याध्यापक, जि. प. प्राथ. शाळा, झिरपे वस्ती,
केंद्र खरडगाव, ता. शेवगाव, मोबा. ९४२००३८३११

## कामरगावच्या नागनाथ मंदिरासमोरील
# बारव सांगतेय १७२० च्या जलसंवर्धनाची कहाणी!

**शके १६४२ मधील शिलालेखातून बारवेच्या जीर्णोद्धाराची नोंद । धार्मिक श्रद्धेसोबत लोककल्याणाची परंपरा अधोरेखित**



■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
नगर तालुक्यातील कामरगाव येथील नागनाथ मंदिरासमोरील बारवेच्या पायऱ्यांजवळ आढळून आलेला शिलालेख अठराव्या शतकातील धार्मिक, सामाजिक आणि जलव्यवस्थापनाच्या परंपरेवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकतो. शके १६४२, अर्थात इ.स. १७२० मध्ये या बारवेचा उद्धार अर्थात जीर्णोद्धार करण्यात आल्याची नोंद या शिलालेखात आढळते. त्यामुळे हा लेख स्थानिक इतिहासासोबतच तत्कालीन जलसंवर्धनाच्या परंपरेचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो.

कामरगाव येथील नागनाथ मंदिराच्या समोर असलेल्या बारवेच्या पायऱ्या उतरताना समोरील कमानीच्या डाव्या बाजूला उंचावर एका शिळेवर हा शिलालेख कोरलेला आहे. हा लेख उठाव स्वरूपातील असून तीन ओळींचा आहे. देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत हा मजकूर कोरण्यात आला आहे.

अनेक वर्षे उघड्यावर असल्याने वातावरणाचा परिणाम शिलालेखावर झाला असून पहिल्या ओळीतील शेवटची काही अक्षरे तुटून गहाळ झाली आहेत. काही अक्षरेही पुसट झाली आहेत. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर अधिक स्पष्टपणे वाचता येत असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.

**शिलालेख वाचन**

**१.।।श्री नागनाथ प्रा .।।स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके( १६४२)।।**
**२.।।शार्वरी नाम संवत्सरे श्रावण मासे कृष्ण पक्ष तिथौ।।७।।**
**३.।।रविवासरे तद्दिनी वापी उद्धार न श्रीकृष्णार्पणामस्तू भव...।।**

या लेखातील कालनोंदीनुसार शालिवाहन शक १६४२, शार्वरी नाम संवत्सर, श्रावण महिन्यातील कृष्ण पक्षातील सप्तमी आणि रविवार असा उल्लेख आहे. दिलेल्या माहितीनुसार ही तारीख १४ ऑगस्ट १७२० अशी निश्चित करण्यात आली आहे.

शिलालेखातील 'वापी उद्धार' हा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. 'वापी' म्हणजे बारव किंवा पायऱ्यांची विहीर. 'उद्धार' म्हणजे तिची दुरुस्ती, जीर्णोद्धार किंवा पुनर्बांधणी असा अर्थ होतो. त्यामुळे नागनाथ मंदिर परिसरातील या जलस्रोताचा त्या काळात जीर्णोद्धार करण्यात आला असल्याची स्पष्ट नोंद या शिलालेखातून मिळते.

बारव ही केवळ पाण्याची व्यवस्था नव्हती, तर गावच्या सामाजिक जीवनाचा महत्त्वाचा भाग होती. स्थानिक नागरिक, प्रवासी आणि मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी पाण्याची उपलब्धता करून देण्याच्या दृष्टीने अशा जलस्रोतांचे महत्त्व मोठे होते. त्यामुळे बारवेचा जीर्णोद्धार हा धार्मिक कार्यासोबतच लोककल्याणकारी उपक्रमही होता, असे या शिलालेखावरून दिसून येते.

शिलालेखाच्या शेवटी या कार्याचे फळ श्रीकृष्णार्पण करण्याचा उल्लेख आढळतो. धार्मिक कार्यातून लोककल्याण साधण्याची आणि त्या पुण्यकर्माचे फळ देवाला अर्पण करण्याची तत्कालीन मानसिकता यातून दिसून येते.

नागनाथ मंदिर आणि बारव यांचा परस्पर संबंध लक्षात घेतला तर मंदिर परिसर हे केवळ धार्मिक उपासनेचे केंद्र नसून सामाजिक आणि सार्वजनिक उपयोगाच्या सुविधांचेही केंद्र होते, असे अनुमान या पुराभिलेखातून करता येते.

शके १६४२ ची कालनोंद या शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व वाढवते. हा काळ छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या कारकीर्दीचा आहे. देवनागरी लिपी, मराठी भाषा, संवत्सर, तिथी आणि वार यांचा वापर करून केलेली नोंद तत्कालीन लेखनपद्धती आणि कालगणनेची माहिती देते.

त्यामुळे हा शिलालेख केवळ धार्मिक स्मरणिका न राहता तत्कालीन समाजजीवन, जलव्यवस्था, धार्मिक दानपरंपरा आणि सार्वजनिक बांधकामांच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुराभिलेख ठरतो.

आज जलसंधारण आणि पाणीबचतीवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होत असताना सुमारे तीनशे वर्षांपूर्वी बारवेचा जीर्णोद्धार करून जलस्रोत जतन केला जात असल्याची नोंद या शिलालेखातून समोर येते. गावातील पाण्याचे स्रोत टिकवून ठेवणे, त्यांची दुरुस्ती करणे आणि पुढील पिढ्यांसाठी त्यांचे अस्तित्व कायम ठेवणे ही तत्कालीन समाजाची गरज होती.

या दृष्टीने कामरगावचा नागनाथ मंदिर बारव शिलालेख हा स्थानिक जलव्यवस्थापनाच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज मानला जाऊ शकतो. शिलालेखाची माहिती, संकलन व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## पाथर्डीत उद्या भव्य तिरंगा पदयात्रा

**नगरपरिषद भवनापासून अजंठा चौकापर्यंत राष्ट्रप्रेमाचा जागर**

● **पाथर्डी । वीरभूमी–**
भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पाथर्डी येथे बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पाथर्डी नगरपरिषदेच्या नवीन इमारतीसमोरील झेंडा वंदन मैदान येथून या पदयात्रेला सुरुवात होणार आहे.

या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी नागरिक, सामाजिक संस्था, समविचारी संस्था, महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या या पदयात्रेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**पदयात्रेचा मार्ग**

■ पाथर्डी नगरपरिषद नवीन इमारत झेंडा वंदन मैदान – नाईक चौक – कोरडगांव चौक – विजय हनुमान मंदिर – छत्रपती शिवाजी महाराज पुतळा – बोडखेबाबा चौक – नवोदय गल्ली – जय भवानी चौक – क्रांती चौक – अजंठा चौक.

अजंठा चौक येथे तिरंगा पदयात्रेचा समारोप होणार आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान आणि देशभक्तीचा संदेश जनमानसात पोहोचविणाऱ्या या उपक्रमात पाथर्डी शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कोरडगावच्या उपसरपंचपदी मोहिनी देशमुख बिनविरोध

● **पाथर्डी । वीरभूमी–**
पाथर्डी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या कोरडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. मावळत्या उपसरपंच प्रतिभा प्रताप देशमुख यांनी कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदावर मोहिनी काकासाहेब देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



ग्रामपंचायत कार्यालयात लोकनियुक्त सरपंच साखरबाई नामदेव मस्के यांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. ग्रामसेवक तथा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन शंकर दातीर यांनी काम पाहिले. यावेळी युवा नेते रवींद्र उर्फ भोरूशेठ म्हस्के, माजी उपसरपंच सौ. प्रतिभा देशमुख, ग्रामपंचायत सदस्या सौ. मनिषा वाळके, स्वराज बोंद्रे, त्रिंबक देशमुख, मुमताज शेख, सौ. संगीता काकडे, माया ससाणे आदी उपस्थित होते.

ग्रामपंचायतीचा कार्यकाळ चार वर्षे पूर्णत्वाकडे असून, या काळात गावातील अनेक प्रश्न व विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. आगामी काळातही प्रलंबित विकासकामे व ग्रामस्थांचे प्रश्न सर्वांना सोबत घेऊन मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे युवा नेते रवींद्र उर्फ भोरूशेठ म्हस्के यांनी सांगितले.

यावेळी राहूल मस्के, संभाजी देशमुख, सजन घोरपडे, नारायण बनसोडे, युसुफभाई शेख, प्रभाकर बापू काकडे, पंडित दादा काकडे, स्वप्निल देशमुख, माऊली देशमुख, बाबासाहेब मासाळ, बाळासाहेब मासाळ, बबनराव देशमुख, नानासाहेब देशमुख, बाळासाहेब देशमुख, योगेश मोरे, कालुभाई शेख, समीर बागवान यांच्यासह खंडोबानगर, मुखेकरवाडी व कोरडगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करंदीच्या महिलांची 'स्नेहालय' अभ्यासदौऱ्यातून सामाजिक जाणीव समृद्ध

**वंचित घटकांच्या जीवनाशी परिचय । समाजसेवेची प्रेरणा आणि आत्मविश्वासाला बळ**

● **पारनेर । वीरभूमी –**
करंदी गावाच्या आदर्श सरपंच नंदाताई गव्हाणे आणि युवा नेते भास्कर गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करंदी गावातील महिलांसाठी आयोजित 'स्नेहालय' अभ्यास व प्रेरणादायी ट्रिप अत्यंत स्तुत्य आणि कौतुकास्पद ठरली. या भेटीसाठी करंदी गावातील सुरेखा गोरे, प्रियांका धुमाळ, मनिषा चौधरी, मीरा पुजारी, शोभा गोरे, हमीदा शेख, साधना गोरे, सुमन आतकर, सुवर्णा एकविरे, सुभद्रा क्षीरसागर, माधुरी औटी, दिपाली थोरात, विमल चौधरी, स्नेहालय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड आदींनी सहभाग घेतला

ग्रामीण भागातील महिलांना सामाजिक जाणिवांची ओळख करून देणे आणि त्यांना समाजसेवेची प्रेरणा देणे हा यामागचा मुख्य उद्देश होता.या अभ्यास दौऱ्यादरम्यान स्नेहालय जनसंपर्क अधिकारी संगीता सानप यांनी महिलांना स्नेहालय संस्थेच्या विविध प्रकल्पांची इत्यंभूत माहिती दिली. तसेच, गावातील महिलांना संस्थेच्या विविध प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी उपलब्ध करून दिली. या लोकोपयोगी आणि संवेदनशील उपक्रमामुळे महिलांना समाजातील वंचित घटक, एड्स बाधित महिला आणि निराधार बालकांच्या जीवनमानाशी जवळून समरस होण्याची व त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्याची मोठी संधी मिळाली. स्नेहालय संचलित विविध प्रकल्पांची मनाला भिडणारी आणि गांभीर्याने विचार करायला लावणारी भावनिक माहिती या ट्रिपदरम्यान महिलांनी आत्मसात केली. या अनोख्या अनुभवाने महिलांच्या सामाजिक जाणिवा अधिक प्रगल्भ झाल्या असून त्यांच्यामध्ये समाजसेवेची आणि मानवतेची एक नवी भावना निर्माण झाली आहे. आपल्या गावातील महिलांनी अशा प्रकारच्या उपक्रमात सहभाग घेतल्याने त्यांच्यात आत्मविश्वास वाढला आहे.

आदर्श सरपंच नंदाताई गव्हाणे आणि युवा नेते भास्कर गव्हाणे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे आणि सामाजिक समजूतदारपणामुळे समाजातील वंचित घटकांना आधार देण्याचे एक अत्यंत उत्तम कार्य या निमित्ताने घडले. स्नेहालय संस्थेचे महान कार्य समाजासमोर प्रभावीपणे पोहोचवल्याबद्दल आणि या संपूर्ण प्रेरणादायी उपक्रमाने यशस्वी आयोजनाबद्दल स्नेहालय संस्थेच्या वतीने आयोजकांचे व सहभागी महिलांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले आहेत. हा दौरा करंदी गावातील महिलांसाठी एक अविस्मरणीय आणि वैचारिक समृद्ध करणारा अनुभव ठरला.




वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## संत सावता महाराजांनी कर्मालाच ईश्वर सेवेचे माध्यम बनवले : उपमहापौर जाधव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

संत सावता महाराजांनी कर्मालाच ईश्वरसेवेचे माध्यम मानून समाजाला माणुसकी, श्रमप्रतिष्ठा आणि भक्तीचा संदेश दिला. याच विचारांचा वारसा पुढे नेत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून जालिंदर बोरुडे हे धर्म, जात-पंथाचा भेद न करता गोरगरीब व गरजू नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना दृष्टी मिळवून देण्याचे तसेच नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले. संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सोमवारी (दि. १० एप्रिल) नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर ड. धनंजय जाधव बोलत होते. यावेळी ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, फिनिक्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे, युवा नेते यशवंत पानमळकर, संजय ताजणे, राजेंद्र बोरुडे, ह.भ.प. मोहनीराज कुऱ्हे, भानुदास खरपुडे, युवा नेते सोमनाथ जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात आयोजित या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची नेत्रतपासणी केली. एकूण ३२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, पुणे येथील के. के. आय. बुधराणी हॉस्पिटलमध्ये या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. नेत्रतपासणीबरोबरच ज्येष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह यासह आवश्यक आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्याचे वाटपही करण्यात आले. फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून केवळ उपचार व आरोग्य शिबिरांपुरते काम मर्यादित न ठेवता नेत्रदान आणि अवयवदानाबाबत समाजात जनजागृती केली जात आहे. नेत्रदानामुळे अंधत्वाच्या अंधारात असलेल्या व्यक्तीच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो, तर अवयवदानामुळे गंभीर आजारांशी झुंजणाऱ्या रुग्णांना नवजीवन मिळू शकते. या सामाजिक जाणिवेतून फाऊंडेशनचे कार्य सुरू असून, अनेक दृष्टीहीनांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी मिळण्यासाठी नेत्रदान करण्याचे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र बोरुडे यांनी केले, तर गौरव बोरुडे यांनी आभार मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सौरभ बोरुडे, विशाल भिंगारदिवे, प्रितम धाडगे, सोमनाथ हराळे यांच्यासह फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगले सावेडी; गुणवंतांचा गुणगौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरच्या वतीने सावेडी उपनगरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा, सांस्कृतिक वारसा, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि समाजाच्या हक्कांविषयी जनजागृती घडवून आणणाऱ्या भव्य सांस्कृतिक मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमात आदिवासी समाजबांधव, महिला, युवक-युवती आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून भव्य सांस्कृतिक मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, भिस्तबाग महाल मार्गे ही मिरवणूक श्रेयस लॉनपर्यंत काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील आदिवासी युवक-युवती, महिला आणि समाजबांधवांच्या सहभागामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली.

# सार्वजनिक जागांचा योग्य पद्धतीने विकास करण्याला प्राधान्य

**आमदार मोनिका राजळे । शेवगाव शहरातील गीतामाईनगर येथे ७५ लाखांच्या जॉगिंग ट्रॅकचे भूमिपूजन**

**● शेवगाव । वीरभूमी –**

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुलांचा विचार करून शहरातील विकासकामे झाली पाहिजेत. जॉगिंग ट्रॅकसारख्या सुविधा केवळ सौंदर्यीकरणासाठी नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहेत. त्यामुळे सार्वजनिक जागांचा योग्य पद्धतीने विकास करण्याला प्राधान्य दिले जात आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधील गीतामाई नगर येथे शेवगाव नगरपरिषदेच्या माध्यमातून ७५ लाख रुपये खर्चून विकसित करण्यात येणाऱ्या जॉगिंग ट्रॅकच्या कामाचे भूमिपूजन आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

आमदार राजळे म्हणाल्या, जॉगिंग ट्रॅकसाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये निधी मंजूर झाला होता. मात्र नगरपरिषद निवडणुका लांबल्याने आणि प्रशासकीय कारभारामुळे काही विकासकामांना विलंब झाला. आता रखडलेली कामे मार्गी लावण्यावर भर दिला जात आहे. शहरातील रस्ते, पाणी व वीज यांसारख्या मूलभूत सुविधांवरही लक्ष केंद्रित केले जात आहे.

यावेळी बापूसाहेब भोसले, डॉ. नीरज लांडे, नगरसेवक नितीन दहिवाळकर, विनोद मोहिते, सागर फडके, आशा बुलबुले, गणेश कोरडे, राहुल बंब, भीमराज सागडे, उमेश भालसिंग, सुभाष बरबडे, अनिल सुपेकर, रामेश्वर भापकर, सुधीर जायभाये, वाय. डी. कोल्हे, मनेष बाहेती आदी उपस्थित होते.

डॉ. कृष्णा देहाडराय, शेवाळे सर व फिरस्ता ग्रुपचे प्रमुख राधेश्याम तिवारी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी खंडू बुलबुले, वसुधा सावरकर, डॉ. संजय लड्डा, डॉ. मनिषा लड्डा, किरण पुरनाळे, योगेश रोकडे, सुनील पगारे, सुनील घुले, राहुल सावंत, सुरेश लांडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक नगरसेवक सागर फडके यांनी केले. सूत्रसंचालन दीपक कुसळकर यांनी केले, तर आभार कैलास सोनवणे यांनी मानले.



**शेवगाव : गीतामाई नगर येथे ७५ लाख रुपये खर्चून विकसित करण्यात येणाऱ्या जॉगिंग ट्रॅकच्या कामाचे भूमिपूजन करतांना आमदार मोनिका राजळे समवेत बापूसाहेब भोसले, नगरसेवक सागर फडके, आशा बुलबुले, डॉ. नीरज लांडे, नितीन दहिवाळकर, विनोद मोहिते व इतर मान्यवर. (छाया : अमोल कराळे)**

### ३२ गुंठ्यांवर जॉगिंग ट्रॅक

■ सुमारे ३२ गुंठे क्षेत्रावर हा जॉगिंग ट्रॅक विकसित करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुलांना नियमित चालणे, व्यायाम तसेच विरंगुळ्यासाठी चांगली जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी या विकासकामाचे स्वागत केले आहे.

## श्रीछत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. भापकर व डॉ. दांडेकर यांना पीएच. डी. पदवी



**डॉ. अभिषेक भापकर**



**डॉ. शरद दांडेकर**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील दोन अध्यापकांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील डॉ. अभिषेक रामदास भापकर आणि वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. शरद धोंडीबा दांडेकर यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे.

भौतिकशास्त्र विभागातील डॉ. अभिषेक भापकर यांना ३ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील सिंबायोसिस विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना डॉ. शेखर भामे यांचे मार्गदर्शन, तर इराणचे डॉ. खलील घेसारी यांचे सहमार्गदर्शन लाभले. बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून डॉ. भास्कर साठे यांनी काम पाहिले. तसेच पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण सरताळे आणि सीओईपी पुणे येथील डॉ. नंदिनी अय्यर यांचे सहकार्य मिळाले. डॉ. अभिषेक भापकर हे गुंडेगाव, ता. नगर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामदास भापकर यांचे चिरंजीव आहेत.

तर वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. शरद धोंडीबा दांडेकर यांना ७ ऑगस्ट २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यांनी टी. सी. कॉलेज, बारामती येथील संशोधन केंद्रातून आपले संशोधन पूर्ण केले. एकनाथ दिवेकर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बागल जालिंदरनाथ यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. दांडेकर मळा, श्रीगोंदा येथील शेतकरी कुटुंबातून आलेल्या डॉ. दांडेकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून संशोधन क्षेत्रात यश मिळविले. त्यांच्या संशोधन कार्यासाठी टी.सी. कॉलेज, बारामतीचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, विभागप्रमुख डॉ. कानडे, तसेच श्रीगोंदा येथील डॉ. योगेश अहिरे, डॉ. विलास सुद्रिक, प्रा. ऋषिकेश शेळके, डॉ. कदम, प्रा. पडवळ, डॉ. वाघीरे, प्रा. धर्मे आणि प्रा. दोरगे यांचे मार्गदर्शन लाभले. ऑनलाइन सादरीकरणासाठी बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील डॉ. शिवाजी कांबळे यांनी काम पाहिले.

# गोसेवेतून जीवनातील समस्यांवर मार्ग

**तारकेश्वर गडावरील गोशाळेचे कार्य राज्यासाठी आदर्शवत : धर्मेश शहा**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

श्रीक्षेत्र तारकेश्वर गडाची भूमी चैतन्यदायी असून, भाविकांच्या योगदानातून चालणारी येथील गोशाळा राज्यासाठी प्रेरणादायी आहे. या गोशाळेची प्रेरणा घेऊन राज्यभर गोसेवेचे कार्य विस्तारले पाहिजे. गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांनी गोशाळेच्या माध्यमातून कौतुकास्पद कार्य उभे केले आहे, असे मत हैदराबाद येथील राष्ट्रीय जीवजंतू कल्याण मंडळाचे सदस्य धर्मेश शहा यांनी व्यक्त केले.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील गोशाळांची पाहणी, गरजू गायींवर उपचार तसेच गोसेवा कार्यातील अडचणी जाणून घेण्यासाठी मंडळाचे पथक राज्याच्या दौऱ्यावर आहे. या पथकासोबत पशुवैद्यकीय डॉक्टर, आवश्यक साधनसामग्री व औषधांनी सुसज्ज रुग्णवाहिका असून, गोशाळांना गायींच्या आरोग्य व देखभालीबाबत मार्गदर्शन केले जाते.

तारकेश्वर गडावरील गोशाळा सहकार तत्त्वावर सुरू असून, सुमारे २२० गायींचे श्रद्धेने व कौटुंबिक भावनेने संगोपन केले जाते. गोभक्त तरुण निरपेक्ष भावनेने सेवा करीत असल्याने गायींचे आरोग्य व संगोपन चांगल्या पद्धतीने होत आहे. गोशाळेच्या संचालनासाठी महंत आदिनाथ शास्त्री महाराज गेल्या तेरा वर्षांहून अधिक काळ विशेष प्रयत्न करीत आहेत.

धर्मेश शहा म्हणाले, गडावरील प्रसन्न वातावरण आणि गोशाळेतील सेवाभाव अनुभवण्यासारखा आहे. गोसेवा ही धार्मिक व सामाजिक दृष्टीने महत्त्वाची असून, तरुण पिढीला गोसेवेच्या कार्याशी जोडण्यासाठी तारकेश्वर गडाने मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी. गोसेवेसाठी गोरक्षक घडविण्याचे कामही येथे सुरू आहे.

तारकेश्वर गडाच्या माध्यमातून तरुण गोसेवा कार्याकडे आकर्षित होत असल्याने भविष्यात गडाची ओळख गोसेवेचे प्रेरणास्थान म्हणून निर्माण होऊ शकते. गोसेवा अभ्यासकांचे शिष्टमंडळ लवकरच गडाला भेट देईल. येथील कार्याची प्रेरणा घेऊन अधिक गोसेवक तयार व्हावेत, हा त्यामागील उद्देश असल्याचे शहा यांनी सांगितले. तसेच या कार्याचा अहवाल शासनाकडे सादर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांनी शिष्टमंडळातील मान्यवरांचे स्वागत करून गड व गोशाळेची माहिती दिली. गडावर सुरू असलेल्या अखंड महाप्रसाद सेवेबद्दल शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले.



# कोरडगावमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू

**कोरडगावात टँकरने पाणीपुरवठा सुरू । कोरडगाव, खंडोबानगर व मुखेकरवाडीची तहान भागणार**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्याच्या पूर्व भागात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने पाणीटंचाईचे संकट तीव्र झाले आहे. कोरडगाव व परिसरातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. या पार्श्वभूमीवर कोरडगाव ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, कोरडगाव, खंडोबानगर व मुखेकरवाडी येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

टँकरच्या पहिल्या खेपेचे ग्रामस्थांच्या उपस्थितीत नारळ वाढवून व विधिवत पूजन करून स्वागत करण्यात आले. त्यामुळे पाण्यासाठी सुरू असलेल्या नागरिकांच्या धावपळीला तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन कोरडगाव ग्रामपंचायतीने पाथर्डी पंचायत समितीकडे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रस्तावाला मंजुरी मिळाली. त्यानुसार कोरडगाव, खंडोबानगर व मुखेकरवाडी या भागांसाठी दररोज चार टँकर खेपा मंजूर करण्यात आल्या आहेत.

पूर्व भागात अपेक्षित पाऊस न झाल्याने विहिरी, बोअरवेल तसेच इतर जलस्रोतांची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. टँकर सुरू झाल्याने नागरिकांना सध्या काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, पाणीप्रश्न तात्पुरता मार्गी लागल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

यावेळी सरपंच रवींद्र उर्फ भोरूशेठ म्हस्के, उपसरपंच काकासाहेब देशमुख, ग्रामसेवक शंकर दातीर, ग्रामपंचायत सदस्य नागनाथ वाळके, प्रताप नाना देशमुख, स्वराज बोंद्रे, त्रिंबक दादा देशमुख, युनूस शेख, अनिल ससाने, राहुल मस्के, स्वप्निल देशमुख, संभाजी देशमुख, प्रभाकर काकडे, पंडित दादा काकडे, गुलाब देशमुख, युसुफ शेख, माऊली देशमुख, सुभाष सातपुते, बाळासाहेब मासाळ, योगेश मोरे, नानासाहेब देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टँकर सुरू झाल्याने नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला असला, तरी शेतकऱ्यांची चिंता कायम आहे. पूर्व भागात अद्याप पुरेसा पाऊस न झाल्याने खरीप पिकांसह आगामी पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांना आता मोठ्या व दमदार पावसाची प्रतीक्षा लागली आहे. दरम्यान, टँकर मंजूर करून पाणीपुरवठा सुरू केल्याबद्दल सरपंच साखरबाई म्हस्के यांनी पंचायत समितीचे अधिकारी व संबंधित प्रशासनाचे आभार मानले.



■ छाया । अनिल खाटेर

# कामगारांच्या मागण्यांसाठी १७ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**● अकोले । वीरभूमी–**

भारतीय मजदूर संघ, जिल्हा अहिल्यादेवी नगर यांच्या वतीने कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १७ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यादेवी नगर येथे जिल्हास्तरीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. देशव्यापी आंदोलनाचा एक भाग म्हणून हे आंदोलन होणार असून, भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री किरण मिलगीर यांची उपस्थिती राहणार आहे. जिल्ह्यातील कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे संगमनेर विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी केले आहे.

केंद्र सरकारचे कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. यामध्ये ईएसआयसीची वेतन मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार रुपये, ईपीएफअंतर्गत किमान पेन्शन ९ हजारांवरून ९ हजार ५०० रुपये आणि ईपीएफची वेतन मर्यादा १५ हजारांवरून ३० हजार रुपये करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

तसेच बोनस गणनेसाठी वेतन मर्यादा ६ हजारांवरून ३० हजार रुपये, तर बोनस पात्रतेची वेतन मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार रुपये करण्याची मागणी आहे. विविध योजनांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मानधनात भरीव वाढ करावी, अशीही मागणी करण्यात येणार आहे.

कंत्राटी व आउटसोर्सिंग कामगारांसाठी 'समान काम-समान वेतन' तत्त्वाची प्रभावी अंमलबजावणी करावी, श्रमसंहितांमधील कामगारविरोधी तरतुदींमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, बँक कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातील पाच दिवसांचा कामकाजाचा नियम तातडीने लागू करावा, अशा मागण्याही आंदोलनातून मांडण्यात येणार आहेत.

याशिवाय ग्रॅच्युइटीची कमाल मर्यादा २० लाखांवरून ४० लाख रुपये करावी, सर्व पात्र कामगारांना ग्रॅच्युइटीचा लाभ सुनिश्चित करावा आणि देशातील सर्व कामगारांसाठी किमान वेतन ३० हजार रुपये प्रतिमहिना निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

कामगारांच्या हक्कांसाठी जिल्ह्यातील सर्व कामगार बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जिल्हास्तरीय धरणे आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहन भारतीय मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष सुजित उदरभरे, सचिव कृष्णा साठे, कंत्राटी कामगार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन पाटील, राज्य शासकीय कर्मचारी महासंघाचे सुनील मुंगसे आणि महाराष्ट्र वीज कामगार संघाचे जिल्हा सचिव गणेश कुंभारे यांनी केले आहे.

# धीरजसिंह परदेशी हत्येच्या निषेधार्थ पाथर्डी बंद

## हिंदुत्ववादी संघटनांच्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद । नाईक चौकात निषेध सभा, पोलिसांचा चोख बंदोबस्त

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर महानगरपालिकेचे कंत्राटी कर्मचारी धीरजसिंह परदेशी यांच्या निर्घृण हत्येचे पडसाद शहर व तालुक्यात उमटून हिंदुत्ववादी संघटनांतर्फे पुकारण्यात आलेल्या पाथर्डी बंदला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. अत्यावश्यक सेवा वगळता हा बंद पूर्णपणे यशस्वी झाला. बंदचे समर्थक कार्यकर्ते विविध भागातून मोटरसायकल रॅलीद्वारे बंदचे आवाहन करत असल्याने दुपारनंतर सुद्धा दैनंदिन व्यवहार सुरू झाले नाहीत. एरव्ही कोणताही बंद असला की सर्वसामान्यपणे दुपारनंतर व्यवहार सुरळीत सुरू होतात. आज मात्र बंद समर्थकांचा आक्रमकपणा व घटनेचे गांभीर्य बघता बाजारपेठ दिवसभर पूर्णपणे बंद राहिली. अनेक व्यापारी धार्मिक ठिकाणी व अन्यत्र निघून गेले. आंदोलनानंतरही शहरात पोलीस बंदोबस्त कायम असून पोलिसांची शहरातून गस्त सुरू आहे.

अहिल्यानगर मधील दुर्दैवी घटनेमुळे शहरात तणावपूर्ण वातावरण बनले. वातावरणाचा अंदाज बघत पाथर्डी पोलिसांनी ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात करत आंदोलकांशी संवाद साधला. कार्यकर्त्यांची रॅली निघण्यापूर्वी मुख्य बाजारपेठे सह उपनगरांमध्ये तुरळक प्रमाणात दैनंदिन व्यवहार सुरू होते. आक्रमक कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी देत रॅली काढल्याने सर्वच दुकाने बंद झाली. शहरासह विविध उपनगरांमधून नागरिकांशी संवाद साधत कार्यकर्ते राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या बसस्थानकासमोर नाईक चौकात एकत्रित जमले. तेथे निषेध सभा संपन्न झाली.

यावेळी नगरसेवक अमोल गर्जे, व प्रतीक नांगरे, मढी देवस्थान समितीचे माजी अध्यक्ष संजय मरकड, मुकुंद गर्जे आदीं सह विविध कार्यकर्त्यांनी तीव्र शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. पाथर्डी तालुक्यातही अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होत असून कर्तव्यावर असताना हिंदुत्ववादी संघटनेचा कार्यकर्ता जीवानीशी गेला. त्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत सकल हिंदू समाज शांत बसणार नाही. हिंदूंच्या देशांमध्ये हिंदूंवर जर अशा पद्धतीने अन्याय, अत्याचार होऊन प्राण गमवावे लागत असतील तर हिंदू सुद्धा आता शांत बसणार नाही. सर्व पातळयांवर प्रतिकार करण्यासाठी हिंदूंनी संघटित होण्याची आता वेळ आली आहे. अशा घटनेने संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे. जिहादी, गुन्हेगारी, प्रवृत्ती विरोधात तीव्र वातावरण तयार झाले आहे. अशा आरोपींना फाशी व्हावी त्यांना मदत करणाऱ्यांना जन्मठेप व्हावी. अशा लोकांना भारतात राहण्याचा अधिकार नाही. त्या युवकाच्या कपाळी गंध असल्याने त्याची हत्या झाली आहे. सर्व आरोपी व त्यांना मदत करणाऱ्यांचा शोध घेऊन निष्पक्ष, सखोल व पारदर्शक चौकशी होऊन उर्वरित सर्व आरोपींचा शोध तातडीने लागावा. हत्येचा सूत्रधार शोधून आरोपीचे घर जमीनदोस्त करण्यात यावे. अशा विविध स्वरूपाच्या मागण्या निवेदनामध्ये करण्यात आल्या आहेत.

अशा स्वरूपाची घटना जिल्ह्यामध्ये एकमेव नसून यापूर्वी सुद्धा विविध प्रकार घडले आहेत. तिसगाव परिसरामध्ये अजूनही गोहत्या सुरू आहे. हिंदूंनी आपली कार्यपद्धती अधिक व्यावहारिक व संरक्षक स्वरूपाची करायला हवी. योगायोगाने तालुक्यातील विविध संत महंतांचा अशा आंदोलनाला सक्रिय पाठिंबा राहिला आहे. पाथर्डी तालुक्यात सर्व संत महंत एकत्रित यापूर्वी सुद्धा आंदोलने झाली आहेत. येणारा काळ अधिक आव्हानांचा व सामाजिक संकटांचा असल्याने संघटित होऊनच आपले रक्षण आपल्याला करावे लागणार आहे. अन्यत्र झालेली घटना आपल्या गावात होणार नाही. असे न समजता प्रत्येक जिहादी प्रकार आपल्याच बंधू-भगिनींवर झाला आहे. असे समजून एकत्र येण्याचे काम करावे. अशा शब्दात संजय मरकड यांनी आवाहन केले. या निवेदनावर किशोर परदेशी, बाळासाहेब गीते, नानासाहेब पालवे, मुकुंद गर्जे, ज्ञानेश्वर सातपुते, भारत लिपारे, सोमनाथ बंग, विकास दिनकर, उमेश सुपेकर, समर्थ रोडी, मंगेश राठोड, पवन छजलानी, कुणाल महानवर, रवी मोहिते आदी कार्यकर्त्यांची नावे आहेत. पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारत शांतता राखण्याचे आवाहन केले. बंद दरम्यान पोलिसांनी शहरात चोख बंदोबस्त ठेवला होता.



■ छाया । अनिल खाटेर

# शेवगाव रोटरी क्लबला दुहेरी पुरस्कार

## ‘अंधमुक्त व्हिलेज’ उपक्रमात प्रथम, समुदाय सेवेत तृतीय क्रमांक

**● शेवगाव । वीरभूमी–**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांमधील १०९ रोटरी क्लबच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित ‘अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२५-२६’ सोहळ्यात रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीने उल्लेखनीय यश मिळवले. ‘अंधमुक्त व्हिलेज’ संकल्पनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या नेत्रसेवा व नेत्रतपासणी शिबिरांच्या उत्कृष्ट कार्यासाठी क्लबला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार, तर कम्युनिटी सर्व्हिस क्षेत्रात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

लातूर येथे रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या पुरस्कार सोहळ्यात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन सुधीर लातुरे यांच्या हस्ते क्लबच्या वतीने हे पुरस्कार स्वीकारण्यात आले. ग्रामीण व गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचवून त्यांना तपासणी, उपचार व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या क्लबच्या सातत्यपूर्ण कार्याची पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली.



■ छाया । अमोल कराळे

‘अंधमुक्त व्हिलेज’ उपक्रमांतर्गत केवळ नेत्रतपासणी न करता गरजू रुग्णांची तपासणी, मोतीबिंदू व अन्य नेत्रविकारांचे निदान, आवश्यक उपचारांसाठी मार्गदर्शन तसेच वंचित घटकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यावर भर देण्यात आला. या उपक्रमाचा अनेक नागरिकांना लाभ झाला.

कम्युनिटी सर्व्हिस क्षेत्रातील तृतीय क्रमांकामुळे वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांनाही मान्यता मिळाली आहे. आरोग्य, सामाजिक सेवा आणि गरजू घटकांना मदत करण्याच्या विविध उपक्रमांत क्लबने सक्रिय सहभाग नोंदविला.

या दुहेरी यशाबद्दल रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीचे २०२५-२६ चे मावळते अध्यक्ष युसूफखान पठाण यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबने सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवा प्रकल्प प्रभावीपणे राबविल्याचे या पुरस्कारांतून अधोरेखित झाले.

पुरस्कार सोहळ्यासाठी युसूफखान पठाण, विजयकुमार मुधोळकर, डॉ. भागनाथ काटे, शब्बीर शेख, बाळासाहेब चौधरी आणि वसीम सर उपस्थित होते.

# पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद

## आ.आशुतोष काळे । ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न, सभासदांना १५% लाभांश मिळणार

**● कोपरगाव । वीरभूमी–**

आर्थिक शिस्त पाळून पदमविभूषण डॉ.शरदचंद्रजी पवार सहकारी पतसंस्थेने केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. सभासदांच्या हिताला सदैव प्राधान्य, पंधरा टक्के लाभांश देण्याचा निर्णय आणि ठेवीत झालेली बावीस टक्क्यांची वाढ या बाबी संस्थेच्या कामगीरीचे वैशिष्ट आहे. असे प्रतीपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

कोळपेवाडी येथे, संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे, संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र रोहमारे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, संचालक दिलीपराव बोरनारे, सुधाकर रोहोम, सूर्यभान कोळपे, श्रीराम राजेभोसले, डॉ.मच्छिंद्र बर्डे, प्रशांत घुले, सुनील मांजरे, शंकरराव चव्हाण, मनोज जगझाप, दिनार कुदळे, श्रावण आसने, तसेच ज्येष्ठ नेते कारभारी आगवण, विश्वासराव आहेर, ज्ञानदेव मांजरे, बाबासाहेब कोते व सोमनाथ चांदगुडे, सुभाष गाडे, आदि उपस्थित होते.



■ छाया । जनार्दन जगताप

आ.आशुतोष काळे म्हणाले, या संस्थेने कर्मवीर शंकरराव काळे यांचा वारसा जपत सभासदांच्या विश्वासाला प्राधान्य दिले. संस्थेचा पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्राहकाभिमुख सेवा यामुळे संस्थेची विश्वासार्हता वाढली. संस्थेकडे ५३.२४ कोटी रूपयांच्या ठेवी असून ४० कोटी ६८ लाख कर्ज वाटप केले आहे. ढोबळ एनपीए ३.५२ टक्के असून एनपीए च्या व्याज व मुद्दलासाठी ०८ कोटी ६३ लाख ८५ हजाराची गुंतवणूक केली आहे. शंभर टक्के तरतुदीमुळे निव्वळ एन.पी.ए.०% आहे. १ कोटी १४ लाख ३० हजार रुपयांचा नफा झाला. ऑडीट वर्ग ‘अ’ आहे. सभेच्या अध्यक्षपदाची सुचना राजेंद्र ढोमसे यांनी मांडली त्यास अशोक भगत यांनी अनुमोदन दिले. अहवाल वाचन संस्थेचे मुख्य व्यवस्थापक मंगेश देशमुख यांनी केले. विषय पत्रिकेवरील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

याप्रसंगी शरद पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, व्हाईस चेअरमन रावसाहेब चौधरी, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे चेअरमन विजय कुलकर्णी, बँकेचे सर्व संचालक मंडळ व व्यवस्थापन मंडळ सदस्य, गौतम बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे, प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ, मुख्य व्यवस्थापक मंगेश देशमुख, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे मॅनेजर सुरेश पेटकर, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, आदी मान्यवर उपस्थित होते. पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी आभार मानले.

> रिझर्व बँकेने नवीन लायसन्स देण्याचे जाहीर केले आहे. पदमविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार सहकारी पतसंस्था, सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नियमांचे व वसुलीचे काटेकोरपणे पालन करून पारदर्शक कारभार करत आहे. त्यामुळे या संस्थेच्या दृष्टीने भविष्यात हि संधी आहे.
>
> **– आ. आशुतोष काळे**

# युवांनी समाजोपयोगी कार्यात योगदान द्यावे

## राष्ट्रीय सेवा योजनेतून राष्ट्रबांधणीत सहभागी होण्याचे माजी आमदार वैभवराव पिचड यांचे आवाहन

**● अकोले । वीरभूमी –**

समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली जातात. त्यामुळे आजच्या युवा पिढीने महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्यात सहभागी व्हावे, असे प्रतिपादन अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त तथा माजी आमदार वैभवराव पिचड यांनी केले.

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित ‘युवान’ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे शिर्डी येथील योगेश कुमावत, संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजीराव खेमनर, संपत मालुंजकर आदी उपस्थित होते.

पिचड म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांसह अनेक महापुरुषांनी समाज आणि देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले. त्यांच्याकडून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात विविध समाजोपयोगी उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा. ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेत राष्ट्रबांधणीच्या कार्यात योगदान द्यावे.

प्रमुख पाहुणे योगेश कुमावत म्हणाले, भारत हा तरुणांचा देश असून तरुणांमध्ये धाडस, शौर्य आणि सर्वस्व अर्पण करण्याची जिद्द आहे. पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, कृषी, सहकार, क्रीडा आणि समाजविकास क्षेत्रातील आव्हाने स्वीकारून तरुणांनी राष्ट्रबांधणीच्या कार्यात सहभागी व्हावे. सामाजिक विकासासाठी विविध प्रकारचे भेद दूर करून भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

व्यसनांपासून दूर राहून सुदृढ व चारित्र्यसंपन्न युवा पिढी घडविण्याची गरज असून, साधी राहणी आणि उच्च विचारसरणीला योग्य कृतीची जोड द्यावी, असेही कुमावत यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजीराव खेमनर यांनी केले.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

सूत्रसंचालन प्रा. संदेश कासार यांनी केले, तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनील मोहटे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.